# काग[illegible]

9049
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. 9224



REFBK-0007647
REFBK-0007647

[illegible]शिव आठवले

* सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन *

मुद्रक व प्रकाशक
केशव रामचंद्र मोहिते,
[ मॅनेजर
आर्यभानु प्रेस, कोल्हापूर.

—मला अनेक माणसें आवडतात, पण गाढ प्रेम किंवा नितान्त आदर कुणाविषयींही वाटत नाहीं.

—मग हा संग्रह कुणाला अर्पण करूं ?

—तेव्हां कुणीही चांगल्या माणसानें हें पुस्तक आपल्याला अर्पण केलें आहे असें समजावें.

—आणि कुणालाच नको आहे असें आढळून आलें, तर मग हें मी स्वतःलाच अर्पण करीन.

*

## एक मिनिट--

ह्या संग्रहांत समाविष्ट केलेल्या कवितांपैकीं दोनतीनच अप्रकाशित आहेत. बाकी सर्व "विविधवृत्त" "सत्यकथा", "प्रसाद", "रोहिणी", वगैरे नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या आहेत.

कवितांचा लेखनकाल इ. स. १९४३ ते १९५० हा असून प्रसिद्धीकालही जवळजवळ तोच आहे. मला येथें काव्य ह्या विषयावर कसलेही विचार प्रकट करावयाचे नाहींत. तो माझा अधिकार नाहीं; अभ्यासकांचा आहे. तसेंच माझ्या कवितांविषयीं देखील मला कांहींही म्हणावयाचें नाहीं. तें काम वाचकांचें आहे. त्यांनीं ह्या वाचून पहाव्या. कांहीं आवडले तर मला कळवावें, नाहीं आवडलें तर सडकून शिव्या द्याव्या. उगाच संकोच करूं नये.

पुनर्मुद्रणाची परवानगी ताबडतोब दिल्याबद्दल सर्व संपादक; मुद्रक, चित्रकार, वेळोवेळीं हरतऱ्हेचें साह्य करणारे अनेक मित्र ह्या सर्वांचा मी आभारी आहे.

अंबासदन
रविवार पेठ,
कोल्हापूर

सदाशिव आठवले

# अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| कागदाच्या पुंग्या | १ |
| थापांची थाप | ३ |
| सुस्काऱ्यांचा पंप | ४ |
| भल्यांनो येउं नका परतून | ५ |
| बायकिस्तान | ६ |
| मूर्ख लक्षणें | ७ |
| नंदीची अक्कल | १२ |
| बंधुभाव आणि शांति | १३ |
| दोन उपाशी | १४ |
| जीवनाच्या पंचवार्षिक योजना | १५ |
| हृदयाच्या चोरीपूर्वी | २२ |
| पारिभाषिक शब्द | २३ |
| काव्य आणि व्यवहार | २४ |
| कलहगीत | २५ |
| बंडाचा बींमोड | ३३ |
| शंखाचें भाग्य | ३५ |
| शेजारच्या घरांत | ३६ |
| गांवरान गीता | ३८ |
| सर्वांत मोठें काय ? | ४० |
| आमचा दोष | ४१ |
| विषबाधा | ४३ |
| वेळींच सावध | ५१ |
| निरोप | ५२ |
| अवेळीं आलेल्या पावसास | ५३ |
| वेळीं न आलेल्या पावसास | ५५ |
| मवाली आणि सज्जन | ५६ |
| वैपुल्य | ६१ |
| बदलतें बंधुप्रेम | ६२ |
| क्रांतीचा ठणठणाट | ६५ |
| जीवनाचा अर्थ | ६७ |
| प्रेमाची कपबशी | ७० |
| मेला भला मवाली | ७१ |
| पशू | ७२ |
| उतार | ७३ |
| कारण त्याचें न्यारें | ७५ |
| गौळणींचा इषारा | ७६ |
| व्यापारी प्रेम | ७८ |
| दिवाळी आणि होळी | ७९ |
| देव आणि भक्त | ८२ |
| लेंकुरवाळी | ८४ |
| एक द्वंद्वगीत | ८६ |
| सासरगीत | ८८ |
| आई कशी ओळखावी ! | ९० |
| माफी | ९२ |

# कागदाच्या पुंग्या.

कागदाचा गठ्ठा
कवितेंत गेला
नसता कां झाला
उपयोग,

बाळाच्या बोटीला
वाण्याच्या पुडीला
भेळ खावयाला
असा कांही—?

झालाची असतां
काव्य केलें परी
चूक झाली खरी
आतां काय ?

आतां असें करा
तुम्हीं करा चुका
वाचोनीया टाका
मूर्खपणा !

तुमच्या माझ्यांत
असूं द्या गुपित
सांगतो कानांत
नीट ऐका:—

गाजराची पुंगी
वाजली वाजली
नाहीं तरी खाल्ली
मोडोनियां.

कागदाच्या पुंग्या
पहा वाजती कां
नाहीं तरी टाका
बंबामध्यें

—0—

## थापांची थाप—

गेलें कलियुग । थापायुग आलें ।
घरदार गेलें । थापाळून ॥

त्यागाची सेवेची । पुढाऱ्याची थाप
कोण त्याचें माप । घेऊं शके ॥

कलेच्या त्या बाता । लेखकू मारिती ।
कवीही रडती । सुरावर ॥

चांगल्या मालाच्या । व्यापाऱ्याच्या बाता
ऐकतां ऐकतां । पुरे झालें ॥

तैशीं लोणकढी । मास्तरें मारावी ।
पोरांनीं ऐकावी । गुपचूप ॥

कोणीही कोणाला । सानथोर सोर ।
बनवीती बरें । आजकाल ॥

× × ×

परी महाथाप । वेगळीच कीं ती
मारता होताती । चमत्कार ॥

थापांची ती थाप । मारावी डाकूंनीं
ऐकावी मूर्खांनीं । " प्रेमाची " हो ॥

—o—

## सुस्काऱ्यांचा पंप.

जिकडे जावें तिकडे दिसतें प्रेमाचें पीक
प्रेमासाठीं हिंडत हृदया काय लागली भीक ?
कुठें नाचती निर्झर कोठें हिरवें तृण डोळे
भृंगे, पक्षी, लता, तारका काय मंडळी बोले ?

× × ×

कांही नाहीं विरह जाहला आतां काय करावें ?
काय करावें नाहीं ठाऊक ? सुस्कार सोडावे
लहान मोठा खरा नि खोटा विरह असे जैसा
प्रमाण पाहुन हवेंत सुटतो सुस्कारा तैसा

× × ×

प्रभात समयीं, सायंकाळीं तैसे ऐन दुपारीं
सुस्कार आणि सुटति रात्रीं कैसे दारोदारीं
कुणा न यांचा कांहिं फायदा हवेंत विरति फुका
म्हणुन सुचवितो एक कल्पना घ्या अथवा टाका

× × ×

दुचाकींत जर नसेल तुमच्या हवा राहिली कांहीं
आसपास कां मिळतो 'प्रेमिक' कोणी आधीं पाही
चाकापाशी जोडा त्याची नाकपुडी धरुनी
"सुस्काऱ्यांचा पंप" देतसे हवा झपाझप भरुनी

—0—

श्री. न.



# भल्यांनो येउं नका परतून—

कविरायांनो " बाड " आपुलें काखेमधिं घालून्
एजंटांनो " माल " आपला पिशवी गच्च भरून्
प्रचारकांनों हातांत आपल्या " पावत्या " हि घेऊन्
गुरुरायांनों वेळिं अवेळीं येऊं नका झिंगून्

भल्यांनो येउं नका परतून्

मित्रांनो मज पगार झाला वार्ता ही ऐकून्
नातलगांनो लग्न जाहलें माझें हें परिसून्
" गरीब विद्यार्थी मी आहे " बात अशी बहकून्
अन्त पाहण्या माझा सगळे येउं नका धावून्

भल्यांनो येउं नका परतून्

अहो पाहुणे सणवाराचे कां येतां हटकून्
शेजाऱ्यांनो ' उसनें ' कांहीं मागण्यास दणकून्
अखिल जगाच्या लोचटवर्गा कांहीं तरी उकरून्
निरपराध मी गरिब बिचारा कां बसलांत टपून्

भल्यांनो येउं नका परतून्

—o—

# बायकिस्तान

अली महंमद मुस्लीमांचा धन्य पुढारी धन्य जिना
ठेवुन त्याच्या पाय पाउलीं म्हणूं लागली ' ती ' त्यांना
" पुरे सोसला छळ " तुमचा तो आतां सांगते तें ऐका
देउन टाका मला ' बायकिस्तान ' एकदां, कां शंका ?

× × ×

पुरुषापेक्षां पुरुष असोनी कसा बिचारा पाघळला
" माग हवे तें " म्हणुन तियेच्या माथा चरणीं वांकविला
स्वयंपाकघर सगळें आणिक निम्मे घर ही बाकीचें
धोतर लुगडीं जुनी बांधुनी काम होइ सरहद्दीचे

× × ×

प्रेमाचा कीं मूर्खपणाचा असे खेळ सुरु रंगांत
उभी राहिली नकळे कोठुन येउन सासू दारांत
पाहुन तिजला आंत पळे तीं आणि लागली कामाला
कागदपत्रें हातीं त्याच्या दृष्टी लावी गगनाला

× × ×

" बेअकली अन् मूर्ख " म्हणोनी सासू फाडी सरहद्दी
अखंड घर ते पुन्हां जाहलें सासूची वाटे गर्दी.

—0—

## मूर्ख लक्षणें

परतंत्र पाहुनी देशाला
यातना न ज्याच्या हृदयाला
लागे न कसल्या "कार्याला" । तो एक मूर्ख ॥

"कि जय" दुंदुभी ठोकीना
प्रभातफेरी काढीना
फुकटांत सेवा साधीना । तो एक मूर्ख ॥

कधीं न ठोकी व्याख्यान
गाजवी न सभा संमेलन
ठराव न करी गर्जून । तो एक मूर्ख ॥

येतां पाहोनी निवडणूक
उभा न राही छातीठोक
फुकेना "मी उभा" शंख । तो एक मूर्ख ॥

उभा राहिला तरीही
खोटें न सांगे लवलाही
सरळ मार्गे जाऊं पाही । तो एक मूर्ख ॥

मारीना एकही थाप
वचनें न देई अमूप
चार लोकीं बसे गप्प । तो एक मूर्ख ॥

पैसे कोणाला चारीना
कांहीं कोणाला पाजीना
लाल कोठें घोटीना । तो एक मूर्ख ॥

फसवून किंवा अडवून
लुबाडून किंवा रडून
मतें न मिळवी दणकून । तो एक मूर्ख ॥

कुठें मागावी भीक
कुठें झडकावी लाथ
हें न ज्याच्या टाळक्यांत । तो एक मूर्ख ॥

कुणा निंदावें सडकून
कुणा स्तवावें गहिंवरून
ज्याला न येई हें कळोन । तो एक मूर्ख ॥

निवडणूक विद्या पंधरावी
निवडणूक कला पासष्टावी
ज्याला न त्यांची मिळे पदवी । तो एक मूर्ख ॥

निवडणुकीच्या यज्ञाप्रती
तनमनधनाच्या आहुती
पुरोहित जे न टाकिती । तो एक मूर्ख ॥

स्थळ प्रत

पैशावांचून अडायाचें
कार्याचें आणखी स्वतःचें
भरलें नाहीं डोक्यांत ज्याचें । तो एक मूर्ख ॥

नाहीं तत्त्वांचा तनाना
नाहीं बंडाची वल्गना
नाहीं फंडाची कल्पना । तो एक मूर्ख ॥

सर्वत्र वणवणा हिंडतो
कष्टून पैसे जमवितो
आणि त्याचा हिशेब देतो । तो एक मूर्ख ॥

साधून सगळ्या पर्वणी
जमा करी जो वर्गणी
लावी न थोडीही कारणीं । तो एक मूर्ख ॥

पैसा जमविला जनतेचा
जनतेसाठीं खर्चायाचा
बाणा असे ज्या सेवकाचा । तो एक मूर्ख ॥

पैसा असोनी हाताला
फाटकें लुगडें बायकोला
म्हणावें काय त्या नराला ? । तो एक मूर्ख ॥

पैसा असोनी खिशांत
मुलें न ज्याची मोटारींत
काय त्याच्या हो भाग्यांत ! । तो एक मूर्ख ॥

हातांत लाखों हजार
तरीही होतसे बेजार
येईल म्हणोनी सावकार । तो एक मूर्ख ॥

हिंडून अवघ्या पृथ्वीतले
जमवून नोटांचीं बंडलें
बांधी न हवेल्या बंगले । तो एक मूर्ख ॥

देश मानीतसे स्वतःचा
समाज सगळाही स्वतःचा
फंड मात्र कीं दुसऱ्याचा । तो एक मूर्ख ॥

कर्तव्याचें लागे पिसे
पै पै जो जमवीतसे
मात्र रिकामे ठेवी खिसे । तो एक मूर्ख ॥

विचारांत घेतां नवा मनू
फंड म्हणजे कामधेनू
उपाशी तरी जो क्षुद्र मनु । तो एक मूर्ख ॥

११८३८
२८।८।५३

पवित्र फंडाच्या गंगेंत
ध्यावे धुवूनिया हात
चिर न बाणवी चित्तांत । तो एक मूर्ख ॥

विदुराघरची थाळी फंड
झरा सौख्याचा अखंड
तरी ज्याचा मेंदू थंड । तो एक मूर्ख ॥

—०—

## नंदीची अक्कल

कलियुगांत ह्या कथा जाहली सांगतसे मी ती ऐका
देवाजींचें नांव ऐकुनी उगाच बिचकुन जाउं नका
नंदीवरती प्रसन्न झाले श्रीप्रभुशंकर कैलासीं
पाठीवरुनी हात फिरवुनी प्रेमें म्हणती मग त्यासी
" पशो, पाहुनी खूष जाहलों एकनिष्ठ मी तव सेवा
रजा तुला मी देतों आतां करण्या सौख्याचा धांवा
गंमत पृथ्वीवरची बघण्या पाहिजेल जें रूप तुला
मंद सेवका, सत्वर देतों. धांवत नाचत जा बैला."
शिंग हलवतो विचार करतो नंदी मग तो जराजरा
म्हणे " शंकरा, ऐक प्रार्थना निश्चय ठरला हाच पुरा
' अमुकाक्षी ' कीं ' तमुकप्रभा ' जी नटी तारका असे कुणी
रूप तिच्या कुत्र्याचें मजला पालटून दे ईश, क्षणीं "

* * *

नीलकंठ मग " तथास्तु " म्हणती कुलंगि कुत्रा तो झाला
भो, भो, भो, भो, भो, भो भुंकत गुरकत पृथ्वीवर आला
चित्र नटीचा कुत्रा मग तो थाट काय त्याचा पुसतां ?
तोंडे ते रसिकांचे दमती कौतुक कीं करतां करतां

* * *

अक्कल नाहीं नंदीला हे म्हणतां ना जिकडे तिकडे
फोटो त्याचा मासिकांत हा पहा आणखी व्हा वेडे.

—o—

# बंधुभाव आणि शांति

जमुनि हे कावळे काव काव कां करिती ?
कीं कृष्ण काळिजें खगरूपें जळफळती !
ओरडून दमले इकडे तिकडे उडती
मग उडून दमले चोंची वासुन पडती
पण पडल्या पडल्या विचार कोणी करितो
रंगांत येउनी प्रिय मित्रांना म्हणतो
" कावळे गडे हो; आपण भाऊ भाऊ
आपसांत झगडतो जसे गिळूं का खाऊं—
हें नव्हे चांगलें स्थापूं आपण एकी
खुंटते प्रगति ही—उगिच कशाला बेकी ?
हा ठराव आपुला बंधुभाव पाळावा
मग राज्य शांतिचें सर्व सुखाचा ठेवा "
मग नाचति सगळे उंच शेपट्या करुनी
हा ठराव सकळां मान्य जाहला म्हणुनी

\+ + +

इतक्यांत त्या तिथें कांहीं " कुजकें " पडलें
शांतिचें दिवाळें— बंधु कुणाचे कुठले ?

—0—

# दोन उपाशी

वाहती कुणिकडे गर्दीचे हे लोट
तो करुणासागर अथांग तेथें—नीट
" प्राणान्त उपोषण " काय प्रतिज्ञा घोर
करुनियां बैसला तिथें पुढारी वीर

*        *        *

रस्त्यांत कडेला अंध भिकारी दुबळा
मरतसे भुकेनें होउन लोळा गोळा
"—कुणि दया करा हो दादा, बाबा, ताई "
कानीं न कुणाच्या ज्याला त्याला घाई

*        *        *

कुणि फराळ आणी फळें कुणाच्या हातीं
कुणि देइ मिठाई सरबत पेयें येती
लोटून महात्मा म्हणें "नको जा कांहीं"

*        *        *

विव्हळतो भिकारी " दादा, बाबा, ताई ! "

—0—

ग्रंथ संग्रहालय
सं. क्र. ३१०८
१२२५
स्थळ प्रत

# जीवनाच्या पंचवार्षिक योजना

जन्मदिवस——————निसर्ग गातो नव गान
नीट तरी घ्या ऐकून
सजीव झाली ती तान
जीवन आलें गरजून

अखंड टकळी " य्यहाँ कुहाँ "
दूध पाहिजे निश्चय हा
काय चाललें भंवतालीं
कुणास कळतें ह्या कालीं ?

मुठी हाताच्या मिटलेल्या
कशाकशानें भरलेल्या ?

\+ \+

वर्ष ५ वें——————पंख काउचें चल घेऊं
उडून आभाळीं जाऊं
मिळतो खाऊ मज इतका
तुम्हींच सांगा पुरेल कां ?

वाडे सगळे देवांचे
पेटारे जणुं खाऊचे

लुटून आणूं ती रास
देव देतसे बालांस

\+ +

जायाचें इतक्या दूर
उशीर होईल मग फार
—बसेल आई मारीत
नकोच बाबा हा बेत !

\+ +

वर्ष १० वें ——— रोज रोज त्या शाळेंत
काय जाउनी करतात ?
नाहीं शाळा बाबांना
छळतां कां मग पोरांना ?

चिंचा पेरू खाणार
काय आईला कळणार ?
ताई ती तर वैरीण
अखंड करते भुणभूण

केली मस्ती शाळेंत
हळूच सांगे कानांत—
आईच्या आणि बाबांच्या
गोष्टी सांगे पंजीच्या

बंदोबस्त हिचा करणें
हातीं आधीं हें घेणें
काढित बसली रांगोळी
असेल बहुधा ह्या वेळीं

मोठाले घेतो धोंडे
करतो पाठीचें धिरडें

\+ +

धोंडा घेतो इतक्यांत
मारणार तो तितक्यांत
—बघतिल बाबा कदाचित
नकोच बाबा हा बेत !

\+ +

वर्ष १५ वें ——— नाहीं केला अभ्यास
सरळ जाहलों नापास
काय करावें समजेना
विचार येती हे नाना

\+ +

कशास जगणें कष्टांत
जीव देउं का विहिरींत ?

—आईबाप मग रडतात
नकोच बाबा हा बेत !

\+ +

वर्ष २० वें——कोण चालली ती बाला
घालुन हृदयावर घाला
अंग कां असें शहारतें
कां दृष्टि कायम खिळते ?

वाहति प्रेमाचे पाट
विचार खवळे मोकाट
काय चांगलें वाईट
गूढाशीं पडली गांठ

नेत्र तिचा कां वळवळतो ?
मी तर दुबळा बावरतो
काय तियेच्या चित्तांत ?
कोण बैसला हृदयांत ?

\+ +

धीर एवढा करूंच कां ?
विचारून मी पाहूं कां ?

—चप्पल मारिल तोंडांत
नकोच बाबा हा बेत !

\+ +

वर्ष २५ वें———— नको नोकरी व्यर्थ जिणें
धडाडींत धंदा करणें
—बरेच धंदे बुडतात
नकोच बाबा हा बेत !

\+ +

वर्ष ३० वें———— कां साहेबाचे ऐका ?
उत्तर उलटुन देऊं कां ?
—काढिल मजसि निकालांत
नकोच बाबा हा बेत !

\+ +

वर्ष ३५ वें———— मुलगा आठव्या वर्षाचा
कलिजा माझ्या हृदयाचा
धडे वाचतो घडाघडा
कौतुक करतो मी वेडा

\+ +

कसल्या मुंजी हे करिती
मोडुन टाकू ह्या रीती

—दिसेल वाइट लोकांत
नकोच बाबा हा बेत !

\+ +

वर्ष ४० वें———झाला मुलगा नापास
चोप देऊं का खरपूस ?
—टाकील उडी विहिरींत
नकोच बाबा हा बेत !

\+ +

वर्ष ४५ वें———पिकले केस पहा सगळे
करुं कां कलपानें काळे ?
—मुलें आपलीं हंसतात
नकोच बाबा हा बेत !

\+ +

वर्ष ५० वें———अभंग वाचूं तुकयाचे ?
भजन करूं का देवाचें ?
—लक्ष हवें व्यवहारांत
नकोच बाबा हा बेत !

\+ +

वर्ष ५५ वें———भर आला संसाराला
मुलामाणसांनीं भरला

काय उरे माझें काम !
हें तर दिसतें सुखधाम

\+ +

जीव जगीं या बहु रमला
दूर जाऊं का तीर्थाला
-- रडेल चिमणी ती ' नात '
नकोच बाबा हा बेत !

\+ +

वर्ष ६० वें [ मृत्युदिन ] खिळलों कायम शय्येंत
" न्यावें " देवाचा बेत
—वाटे मोडावा बेत
हाय ! नाहिं ना हातांत !!

—०—

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ७६४८
स्थळ प्रत
संग्रह शाखा

# हृदयाच्या चोरीपूर्वी

तो—

“ नेत्र चोरिले मृगाकडून
नाक चांफ्याचे घेशी मागून
गौर ही कांती त्या केतकीची
चाल चोरिली गजराजाची
लुटशी गाल गुलाबापाशी
रंग केसांचा त्या भृंगापाशीं
हृदय माझें बिचारे दीन
सराईत तूं नेशी चोरून ”

ती—

“ नाहीं हो नाहीं व्हायचें असें
हृदय आधीं चोरीन कसें !
अजून नाहीं सांगते गडे
डोकें चोरिलें गाढवाकडे ! ”

—0—

## पारिभाषिक शब्द

तो तिला म्हणाला " प्रिये, " " लाडके, " " सजणे "
" प्रियतमे, " " वल्लभे " ! काय तरी हें रुसणें ?
आळवूं तुला गे कशी " प्रेमले, " " सखये " ?
राग सोड " राणी, " " गुलाबकलिके " चल ये
समजूत होइ ना थकुन शेवटीं गेला
ती फुगून बसली कांहीं कांहीं जुळेना
" वेडि रे वेडि " तो म्हणुनि तिला कुरवाळी
अन् नवल वर्तलें आली बाला जवळी

+ + +

ती तसेंच त्याला " सख्या, " " लाडक्या, " " राया "
म्हणतां न वळे तो, खिन्न जाहली जाया
पण " लबाड " जेव्हां म्हणे गाल फुगवून
चुंबितो तिला तो करपाशीं घेऊन

—o—

# काव्य आणि व्यवहार

" आकाशींच्या तारा
होऊं द्या सुमनें
पडूं द्या वायूनें
पृथ्वीवरी.
बालक होवोनी
सगळी वेंचावी— "
बेकार तो कवी
लिहीतसे.
बायको कवीची
धरी त्याचा कान
म्हणे " हें खोडून
असें लिहा —
आकाशिंच्या तारा
जोंधळ्याचे दाणें
कोंबडा नि होणें
टिपावया. "

—0—

# कलहगीत

(१) ओळख—

नाहींच मुळीं दमणार
भांडणें खूप करणार

किल्लेदार भांडणगडचे । पाटील ही भांडणपुरचे ।
कलहचंडिका जी देवी । 'भगत' आम्हीं सच्चे तीचे ।
चौघडे झडति तंट्याचे । तालावर नाचायाचे ।

सद्‌बुद्धि आधीं सांडावी
भांडणें नीट भांडावीं
रस्त्यांत अब्रु मांडावीं

मग मंत्र आम्हीं जपणार । भांडणें खूप करणार ॥

\+ + +

किति राज्यें येती जाती । साम्राज्यें तरती मरती ।
होतात लढाया, क्रांत्या । माणसें बदलुनी जाती ।
अजरामर आमची जात । थोपटून दंडा म्हणती ।

येउं दे कशिही वेळ
भूकंप तसे दुष्काळ
कां आम्हीं ठेविला ताळ ?

छे! नाहीं असें घडणार । भांडणें खूप करणार ।

\+ + +

(२) कुणी भांडावें ?—

एकाच पूज्य पितयाचे । एकाच आईच्या उदरीं ।
जन्मलो म्हणोनी काय । भांडाया आहे चोरी ? ।
आम्हीं हवे तेवढें भांडू । भोंवतीं जमूं दे सारी ।
भांडतात सख्खे भाऊ
कोण तुम्हीं सांगा पाहूं
आम्हांला येतां शिकवूं ?
जा चला ! आले रणवीर । भांडणें खूप करणार ।

\+ + +

भांडणार सासू सून । भांडणार जावा जावा ।
बापलेक भांडायाचे । मित्रामित्रांचा दावा ।
बायको आणखी नवरा । पोवाडा त्यांचा गावा ।
भांडती पोरटीं छोटीं
भांडतात तरणी ताठी
उचलती थेरडे काठी
कोण कोण हो उरणार । भांडणें खूर करणार ।

\+ + +

देशाचे आम्हि अभिमानी । अभिमान कुणा भाषेचा ।
धर्म, जात, शिष्टाचार । हा धंदा भांडायाचा ।
शोध, कला, तत्वज्ञान । उपयोग करूं सगळ्याचा ।

हें नाहिं कुणाचें वतन
नाहिं मान अथवा पान
भांडावें एकच ध्यान
कोणीही नाहिं चळणार । भांडणें खूप करणार ।

\+ + +

(३) कुठें भांडावें ?—

आम्हीं जिथें जिथें जाणार । भांडणें नीट करणार ।
अमुक ह्या इथें भांडावें । कायदा कोण करणार ? ।
तमुक त्या तिथें नच भांडा । हें कोण शिरीं घेणार ? ।
जिथजिथें वेळ येणार
जिथजिथें संधि मिळणार
त्या तिथें आम्हीं मुखशूर
कोणास नाहीं डरणार । भांडणें खूप करणार ।

\+ + +

लग्नघरीं गडबड चाले । वाद्यांच्या झडती फैरी ।
जन्मोत्सव चालति कोठें । मारितात जन ललकारी ।
संमेलन, सोहाळे ते । होउं दे घरीं बाहेरीं ।
दिसतात लोक आनंदी
प्रेमाचे पावन बंदी
बाजारीं असली मंदी
आम्हि काय चालु देणार ? । भांडणें खूप करणार ।

\+ + +

शेजारीं भांडण उकरूं । शेजारधर्म हा आमुचा ।
गावांत पेटवूं आग । हा धडा ग्रामसेवेचा ।
आपसांत फूट पाडावी । हा सल्ला देशहिताचा ।
हें आपुलें हें दुसऱ्याचें
हें काय नफातोट्याचें ?
भेदभाव विसरायाचे
आनंद घेइ अवतार । भांडणें खूप करणार ।
+ + +
त्या राजसभा, लोकसभा । त्या शाळा हॉटेलें ती ।
तीं गांवें आणि तीं शहरें । बंदरें, परगणे असती ।
झोंपड्या, बंगले, चाळी । ज्या स्थळीं माणसें वसती ।
गगनांत विमानें उडती
सागरांत नावा तरती
आणखी कुणिकडे जाती
आम्हि कुठें नाहिं दबणार । भांडणें खूप करणार ।
+ + +

(४) कसें मांडावें ?—

युवतीयुवकांना प्रेम । लागतें काय शिकवावें ?
चोरून प्यावया दूध । मांजरा कशा सांगावें ?
भांडावें कैसे आम्हां । जन्मापासोनी ठावें ।

उगमांत कसें उकरावें ?

रंगांत कसें चढवावें ?

शेवटीं कसें मिटवावें ?

हे पाठ आम्हीं पढणार । भांडणें खूप करणार ।

\+ + +

आणि कसें कसें मांडावें । हे प्रश्न कशाला पुसतां ? ।

शब्द हे निरर्थक सारे । उत्तरें कशाला देतां ? ।

"कडकडा" खूप भांडावें । काय "कपाळ" सांगू आतां ? ।

नाहीं तेथें शोधावें

चाललें अधिक भडकावें

भडकलें तेल ओतावें

आणखी काय कथणार ? । भांडणें खूप करणार ।

\+ + +

(५) **कां भांडावें ?—**

" करकरा " खाउनी दांत । डाळिंब मुखामधिं फुटते ।

तणतणा ताणुनी डोळे । नेत्रांचें द्वय चमचमते ।

तोंडावर चढते लाली । गालांचे गाजर बनतें ।

सौंदर्य खुलोनी जावें

मुखपङ्कज पूर्ण फुलावें

जनतेच्या नयनि भरावें

म्हणुनि कोण ना झटणार ? । भांडणें खूप करणार ।

\+ + +

खालीवर फुप्फुस होतें । हृदयाचा कातळ बनतो ।
रात्रंदिन स्फुरुनी स्फुरुनी । दंडाचा दगडचि होतो ।
हापटून ' दणदणा ' रोज । पायांचा पर्वत फुगतो ।
लांबरुंद व्हावीं हाडें
काय हे उगिच आखाडे ?
कलहाचे गिरवा पाढे
हा बेत नामी जुळणार । भांडणें खूप करणार ।

\+ + +

कलहाचे कारण काय ?। भूमिका पाठिशी कसली ?।
ह्या असल्या शंका घेती । शिकलेले नंदी नकली ।
भांडणें नसावीं याला । उत्तरें काय बेअकली ?।
कुणि खुशाल म्हणति नसावीं
आम्हि बोंबलणार असावीं
कुलुपाला नाहिं चावी
सत्य पेटींत राहाणार । भांडणें खूप करणार ।

\+ + +

(६) **कशानें भांडावें ?—**

आमुचे आघाडी वीर । बंदुका, विमानें, तोफा ।
रणगाडे, बोटी यांचा । भांडती घेउनी ताफा ।
ती त्यांची रीतच न्यारी । जन बघुनि टाकिति धापा ।

ग्रंथ संग्रहालय ७२२४५

जरि एकच आमची जात
तें तेज नाहिं आमच्यांत
आमुचें सर्व तोंडांत
तोंडांत एक देणार । भांडणें खूप करणार ।
\+ + +
चापट्या, रपाटे, लाथा, । चावणें, मारणें धोंडे ।
जंबिये, सुरे आणि चाकू । काठ्यांचे भरले गाडे ।
त्या शिव्या, शाप ते गोड । जिव्हेंत रसाचे हांडे ।
जे मिळेल हातीं त्यानें
कांहीं नसतां तोंडानें
जो मुका खुणांनीं त्यानें
भांडावें धरुनी धीर । भांडणें खूप करणार ।
\+ + +

(७) **किती भांडावें ?—**

बाळाचें कौतुक करणें । तें किती आईला ठावें ।
" लाल कडू " कितिसें प्यावें । तें तळिरामास पुसावें ।
ध्यानांत तयांचे सल्ले । ध्यावे, तितकें भांडावें ।
आद्यंत नाहिं जगतास
कोठून असति कलहास
प्रश्न " किती " हा फडतूस
वाटेल तसे करणार । भांडणें खूप करणार ।
\+ + +

(८) प्रतिज्ञा—

अवलाद आमची शूर । शूरांचा एकच बाणा ।
नांदते जगामधिं शांति । चल, टोला मारा, हाणा ।
सुख, समाधान वाढावे । हे चाळे सुचती कोणा ! ।
बंधुभाव, एकी, समता
बेळाशक मारा बाता
ठेवतो बजावुन आतां
केऽहाहि नाहीं दमणार । भांडणें खूप करणार ।

—०—

## बंडाचा धींमोड—

हृदयाचे देशीं
राज्यकारभार
करीते चटोर । कु. वासना ॥

राज्य त्या राणीचें
धुंद उन्मादाचें
चैनीचें मौजेचें । बेसावध ॥

कुविचार सेना
अनीति सेनानी
राणीची दिवाणी । असत्याळा ॥

× × ×

शील, सद्विचार,
सत्य, नीति, न्याय,
हृदयीं न काय—। साधुसंत ? ॥

" महा महा राणी
नीघ जा येथून "
सांगती गर्जून । क्रांतिकारी ॥

बिचारी ती राणी
कांहीं न बोलली
जरा बिलगली । बंडखोरा ।।

बंडखोर जीव
थामावून गेले
ना तरी सरके । जरा दूर ।।

वासना राणीनें
दिधले चुंबन
गेले गारठून । बंडवाले ।।

राणीच्या राज्याची
अशी ही करणी
लोळती चरणीं । साधुसंत ।।

—०—

## शंखाचें भाग्य—

देव्हारिंचा शंख
आंतून पोकळ
अकाळविकाळ
ध्वनि त्याचा
पटती ह्या खुणा
कुणी तया तरी
म्हणेना पुढारी
भाग्य त्याचें ! ।

—0—

## शेजारच्या घरांत—

[ "शेजारच्या घरांत आलास पाहुणा तूं" हें गीत कितीही चांगलें असलें तरी वेळीं अवेळीं, कुणींही कुठेंही आणि कसेंही गायल्यामुळें फार त्रास होतो. असा त्रास होऊं लागल्यावर खालील ओळी म्हणूं लागल्यास उपर्युक्त गाणें बंद होतें. अनुभव घेऊन पहावा. ]

शेजारच्या घरांत
आलीस पाहुणी तूं
फाडून नेत्र बघसी
माझ्या घरा परंतू
+ +
असतां भल्या पहाटे
झोपेंत मी पडून
छळतेस नेमकी कां
जात्यावरी रडून
+ +
ओटीवरी मी येतो
सहजी बसावयासी
टाकोनि सडा हातचा
कां पदर उडवितेसी
+ +

आंघोळिला नदीला
जातो तिथेंही जाच
कपडे धुवावयाला
तुज वेळ फक्त हीच !

\+ +

दिसलीस नाहिं कोठें
गेलीस आज बाळे
सुटलो नको बघाया
ते जबरदस्त चाळे

\+ +

आहे मनीं खुषींत
गेलीस एकदा तूं
येशील काय फिरुनी
धास्ती उरीं परंतू

—o—

## गांवरान गीता

[ **श्रीकृष्ण यादव**—खेडेगांवांतील किराणा मालाचा एक दुकानदार.
**अर्जुन पांडव**—दुकानांतील माल देणारा नोकर ]

**अर्जुन उवाच—**

कृष्णशेठ तुम्हांपाशीं । राहिलों नोकरीस्तव
रुखरूख मनीं राही । टाका काढून यादव ।
तांदूळ बाजरी न्याया । येती दीन गिऱ्हाइकें ।
भाव घेतां अवासव्वा । हात माझा बघा रुके ।
भोंवती आपले बंधू । सगे दोस्त नि सोयरे ।
ढाळती अश्रु ऐकोनी । भाव आपला अरे, अरे !
कुणाला काय सांगावें । पैसे घ्यावे कसे किती ?
दाखवूं मी कसें तोंड । छे! छे! छे! चळली मती।
सारें सारेंच श्रीकृष्णा । झणीं सांगून टाक तें ।
मी आपुला घरीं जातों । "वेपथुश्चोपजायते" ।

**श्रीकृष्ण उवाच—**

अरेरे अर्जुना ऐशी । तुझी झाली स्थिति कशी ।
अरे तूं तरणाबांड । बायकांसारखा भिशी ! ।
अर्ज्या पोरा, महामूर्खा । भाव घेणें कसा किती ।
कळणार तुला काय; । मूढ जेथें महारथी ।

खरें, खोटें, कमी, जास्ती। नीति, अन्याय, न्याय नी।
पुराणामधल्या बाता। बाळा आणूं नये मनीं।
बाबा हा—हाच व्यवहार। कर्तव्य व्यवहार हा
सांगतो ऐक व्यवहारी। गोष्ट आज तुला अहा।
धीरगंभीर हो शूरा। भिऊन जमतें कसें ?।
तराजू चल घे हातीं। काप हे बकरे जसे।
पगार वाढला तूझा। विसाचा पूर्ण शंभर।
कामाला लाग रे पाहूं। नीट बांधून कंबर।
नये आणूं मनीं कांहीं। नये बोलूं कुठें तरी।
येतां किंतू जरा कांहीं। स्मरावी नोट शंभरी।

**अर्जुन उवाच—**

अफाट आपुलें भगवन्त ज्ञान
ऐकून झालों मी सावधान
संपे निराशा सरल्याहि शंका
दुनियेंत मी वाजविणार डंका ॥

[ इति श्री ग्रामगितायां प्रथमःच अन्तिमःचाध्यायः। ]

—0—

## सर्वांत मोठें काय ?

' दुर्गाहुन ' मोठें काय ?
ती ' पृथ्वी ' नाहीं काय ?
' पृथ्वीहुन ' मोठें कांहीं
ये ' सूर्य ' मनीं लवलाहीं
' सूर्य ' कोण इतका होत
हें ' विश्व ' चि होय अनन्त.
—लागला शोध बाळूला
जाऊन कथी आईला.
मग म्हणते आई, " बाळ्या,
आलास काय चांडाळा,
मी आहे जा कामांत
' विश्व फिश्व ' घाल चुलींत "
—शिरतें ना ' विश्व ' चुलींत ?
संशोधक झाले चीत
मोठें हि काय सर्वांत
बाळूच्या ये ध्यानांत

—0—

नों. न. ११८३ २८१८

## आमचा दोष !

आम्हीं नव्हतों आमुचे बाप
उगाच कां मग पश्चाताप ?

— केशवसुत

[ वरील ओळी वाचल्यावर एका लहान मुलीला त्याच चालीवर काय वाटलें— ]

*                *

आम्हीं नाहीं आई आमुची
दिरंगाई मग कां वेणीची ?

*                *

आम्हीं नाहीं आमुच्या " बाई "
अभ्यासाची कां कुचराई ?

*                *

आम्हीं नाहीं आमचा ईश्वर
रोज कोठचा गे रविवार ?

*                *

आमचा 'मोत्या' मी नाहीं ना !
चावूं कैशी मग बाबांना ?

*                *

आम्हीं नाहीं आमची ‘ माऊ ’
चोरुनियां मग कैसे खाऊं ?

*    *

आम्हीं नाहीं जर पंचांग
रोज दिवाळी कोठुन सांग ?

*    *

आम्हीं नाहीं आमचा ‘ बाळू ’
काम चुकवुनी कशी ग पळूं ?

*    *

आम्हीं नाहीं आम्हां हवे ते
दुःख भोगणें भाळीं येतें

—o—

## विषबाधा

मराठी ग्रंथ संग्रहालय
नों. नं.

गांवाबाहेर टोंकाला
माळ मोठा पसरला
दूर ऐशा ह्या जागेला
येतो कोण ? ॥ १ ॥

कोण येतसे कोठून—
विचाराल ऐसें म्हणून
ऐका कान देऊन
सांगतों तें ॥ २ ॥

होती जेव्हां तीन सांजा
' थांबते जगाची ' ये जा '
तेव्हां होतो गाजावाजा
फार येथें ॥ ३ ॥

श्वान सगळे ग्रामवासी
नेमके ह्याच वेळेसी
जमती एका कार्यासी
फार मोठ्या— ॥ ४ ॥

श्वान म्हातारे कोतारे
तरणे बायका-पोरें

झाडून येती सारे
हीच एकी ! ॥ ५ ॥

दिवसामाजीं काय घडलें
किती मेले नी जन्मले
कुठें कांहीं बिघडलें
चर्चा हीच ॥ ६ ॥

असेच एके दिवशीं
श्वान जमले सभेशीं
हजेरी घेतांच त्यांसी
कळों आलें ॥ ७ ॥

"टिप्या" कुळंगी कुतरा
गोजिरवाणा छोकरा
लाडका आणखी प्यारा
आला नाहीं ॥ ८ ॥

कुणी म्हणे काय झालें
कुणा दुसरेंच वाटलें
तिसऱ्याचा तर्क चाले
नाना परी ॥ ९ ॥

टिप्या परंतु इतक्यांत
आला नाचत धांवत
झळके सर्वांच्या स्मित
शेपटीवरी ॥ १० ॥

टिप्या सुटला नाचत
सैरावैरा धांवत
बेफाम चाले भुंकत
मस्त झाला ॥ ११ ॥

स्मित सर्वांचें लोपलें
म्हणती ऐसें काय झालें ?
वेड का तुला लागलें
ही का थट्टा ? ॥ १२ ॥

टिप्या कोठचे ऐकतो ?
कोणाकडे लक्ष देतो ?
मात्र सारखा गुरकतो
येतां जातां ॥ १३ ॥

क्षणांत मारी उंच उडी
लगेच कुणाची खोडी

पाहतां पाहतां तोडी
लचके कोणा ॥ १४ ॥

समजून कोणी घालतो
“ हाडें ” “ माकऱ्या ” आणतो
टिप्या गुर्मींत सांगतो
थूः थूः थूः थूः ॥ १५ ॥

करतां कोणी उपदेश
म्हणे तयांना “ बदमाष,
करीन तुमचा नाश
चालते व्हा. ” ॥ १६ ॥

संपले ते युक्तिवाद
साम दाम दंड भेद,
करितात सगळे खेद
कसें झालें ? ॥ १७ ॥

टिप्या तो ऐन रंगांत
ज्याच्या त्याच्यावरी भुंकत
सांगे सुटत ऐटींत
“ मीच मोठा ” ॥ १८ ॥

ग्रंथ संग्रहालय
सं. नं. ३०८१
२११६
प्रथम प्रत

देतो न मान कोणाला
अक्कल काय ती ह्याला
धरूनी ह्याच रीतीला
वागतोहे ॥ १९ ॥

' भो भो भू भू ' भुंकणें
दिसेल त्याला निंदणें
ओरबाडणें चावणें
क्रम चाले ॥ २० ॥

बघोनी असले चाळे
जमले शहाणे आगळे
म्हणती ह्याचें वाटोळें
कोणी केलें ! ॥ २१ ॥

अनुभवी कोणी म्हातारा
म्हणे " जरासा धीर धरा;
रोगाची ह्या परंपरा
जाणतों मी. " ॥ २२ ॥

" असले रोगी पाहिले
प्रकरण हेंही त्यांतलें

कितीक होतील असले
भविष्यांत ॥ २३ ॥

ऐकून त्याचें त्यावेळीं
स्तब्ध जाहली मंडळी
" काय " म्हणोनी वाटोळी
रचना होय ॥ २४ ॥

सांगाया लागती " काका "
" बंधु भगिनींनो ऐका,
प्रकार नसे हा नवखा
रोजचाच " ॥ २५ ॥

" मानवी युवती सुंदर
रुबाबाचा शोक फार
नटणें थटणें अवतार
विचारूं नका ॥ २६ ॥

काय काय त्या केशरचना
कपड्यांच्या नी कल्पना
आपआपुल्या वल्गना
बेसुमार ॥ २७ ॥

पाळतात कोणी पोपट
कुणी मोराच्या छांदिष्ट
कबुतरें नी पाळतात
कुणी पोरी ॥ २८ ॥

तसेंच कोणा आवडे
गोजिरवाणें छबडें
लहानगें छबकडें
आपल्यांतलें ॥ २९ ॥

असेल आपुल्या " टिप्याची "
मालकीण कोणी नखऱ्यांची
तरणी कारटी साची
शंका नाहीं ॥ ३० ॥

चवचाल नी ती पोर
लाड करतां फार फार
कुरवाळून तें शरीर
जवळ घेई ॥ ३१ ॥

जवळ घेवोनी " टिप्याला "
गोंजारोनी लाडक्याला

असेल तियेनें घेतला
मुका त्याचा ॥ ३२ ॥

मुखस्पर्श तो मानवाचा
त्यांतूनही ललनेचा
त्यांतल्या त्यांत युवतीचा
हरे राम ॥ ३३ ॥

जालीम हें " विष " जगांत
होतात घोटाळे अत्यंत
क्षणार्धांत होतो घात
कोणाचाही ॥ ३४ ॥

" टिप्याचीही " ह्याच रीती
झाली आहे अधोगती
कारण दुसरें संप्रती
खास नाहीं " ॥ ३५ ॥

ऐकून हें महाज्ञान
डोलवीती श्रोते मान
" खरें खरें " हें म्हणून
शांत झाले ! ॥ ३६ ॥

—0—

## वेळींच सावध—

नव पर्णफुलांनीं उभवुन रम्य पताका
येतसे " पाडवा " हासत नाचत नवखा
ह्या सुरम्य दिवशीं पवित्र करुं या अवनी
फडकवून झेंडा स्वातंत्र्याचा गगनीं
किति दूर दूर तीं हिरवीं पर्वताशिखरें
राहिले आकाशीं ध्येयाचे ध्रुवतारे
हं ! गुलाम आपण शिलंगणाला जाऊं
अजि " विजयादशमी " जय जय गीतें गाऊं
आठवे कुणाला जात कुणाला धर्म
आणि देश कुणाला मानवतेचें कर्म
" संक्रांत " आज ही विसरून जाऊं तेढ
तिळगूळ खाउनी बोल्ड अवघे गोड
मागून येतसे धावत फाल्गुनमास
आधींच करूं या शांतीचा जयघोष
जातीऊ राहुनी कार्यें, ध्येयें सगळीं
लागेल करावा शंख पेटतां " होळी. "

—०—

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ७६८७
(स्थळ प्रत)

# निरोप

[ मृत्युशय्येवर असतांना माझ्या तोंडून खालील श्लोक बाहेर पडोत- ]

\+ +

त्या नव्या जगाच्या खुणा सर्वही पटती
त्या नव्या युगाच्या ललकाऱ्या मनिं ठसती
आमंत्रण तिथलें चला टळो ना वेळ
कां तिष्ठत ठेवा, गरिब बिचारा काळ

\+ +

मोडून बिऱ्हाडें जागा दुसरी बघती
कीं बदली होतां दुसऱ्या गांवा जाती
कर्तव्य संपतां अधिक कुणी थांबावें ?
तें नव्या जगांतिल काम कुणी उरकावें ?

\+ +

हें वंदन माझें आप्त मित्र शत्रूंना
मम जीवन तरुला सिंचन केलें त्यांना
हा पहा चाललो जा सर्वही विसरून
अन् घाई करूनी येऊं नका मागून

—0—

## अवेळीं आलेल्या पावसास—

नों. क्र. ९१८३८ २८।८।७३

ऋग्वेद कालापासुनी
स्तवीत आले ऋषीमुनी
आहुत्या तुपाच्या ओतोनी
वरुणा कृतघ्ना विसरोनी— । गेलास ना ? ॥

अक्कल ठेवोनी गगना
कोसळला खालीं दीडशहाणा !
ही कां तुझी शौर्याची वल्गना !
कां ही तुझी विनोदी कल्पना ? । सांग शंखा ॥

सोमपानें कां आली धुंदी ?
कां कुणी अप्सरा छंदीफंदी,
बनविते तुजला पुरा नंदी ?
टाळी कुठल्या स्वर्गानंदी — । लागली रे ? ॥

मित्र, पाहुणे, शेजारीं
नेमके अवेळीं ठाकती दारी
पावसा तैसा माजोरी
होवोनि येशी सरीवर सरी । धो, धो, धो, धो, ॥

१८०६९
२१७१२

काढोनि वेसी तोंडचा घास
दांत लाविसी नरडीस
सावकार कोणी दिसतोस
मांडवळवाला किंवा खास । परदेशींचा ॥

चाळे तुझे हे अनिवार
करिसी जनतेला बेजार
सारा मूर्खांचा कारभार
अरे ! झालासि काय सरकार ? । सांग पाहूं ॥

—o—

## वेळीं न आलेल्या पावसास—

कां पावसा न येसी
वेळेवरीच नीट
झालास काय शिंपी,
किंवा कुणी परीट ?
करिसी किती उशीर,
विद्यार्थि काय रे तूं ?
नाहींस दूधवाला,
मग कां असें परंतू !
वेळेवरी न येण्या
आहेस काय पोस्टमन्
होतोस काय रेल्वे,
जी. आय्. पी. वा एम्. एस्. एम् ?
उशिराच यावयाची
खाशी डुलत स्वारी
दिसतोस तूंहि लेका
मोठा कुणी पुढारी

—0—

## मवाली आणि सज्जन

( १ )

पहा पोरगी कोण ही एक धीट
दुचाकीवरी बैसुनी नीट ताठ
कुठें चालली एकटी दूर दूर
नसे लाज भीती कशी ही छचोर
गुलाबी तिचे गाल इत्यादि बा रे
नको वर्णनें वाचका पाठ सारें
छबेली अशी मारते पाय वेगें
दुचाकी पळे वायु कापे दुभंगे
तिला पहाते जाहले गुंड पुंड
तयीं गांवचे दोन विख्यात दंड
तिनें गांवची वेस ओलांडियेली
असें पाहुनी ठाकले हे मवाली

( २ )

सायकली घेऊन निघाले
पुंड गुंड फांकडे ते भले
बघतां बघतां अंतर तुटलें
जवळ जवळ येऊन पोंचले

गुंड्यानें पुंड्यास हेरलें
पुंड्यानें गुंड्यास वळखलें
दोघांचेही बाहू स्फुरले
दांतांनींही करकर केलें
" लेका रे " गुंडोजी वदले
" बेट्या ! " उत्तर त्यास मिळालें
" हराम " " पाजी " सर्व निघाले
छेः छेः ! लिहिणें अशक्य झालें
गुंड्यानें मग विचार केला—
" पाहुन घेऊं नंतर ह्याला
उडून तें जाईल पांखरूं
होईल माझा पुरता मोरू "
पुंड्या तैसा मनीं म्हणाला–
" जातो कोठें गुंड्या साला ?
आतां जाइल ती निसटून
बगाराम मी मात्र ठरेन
पुन्हां दुचाक्या पुढें निघाल्या
पथीं समांतर तीन चालल्या
मधें शोभते गोड छबेली
डावी उजवीकडे मवाली

गुंडोबाची शीळ वाजते
पुंडोबाची तान कांपते
असे चालले प्रकार नाना
निर्भय हांसे मधली ललना
मागें पुढती इकडे तिकडे
कधीं सरळ अन् कधीं वांकडे
सहाही चाकें गरगर फिरती
तशीं काळिजें भिरभिरभिरती
बेडर ती मुद्दाम खोकली
घामानें चिंबले मवाली
पाहुन असलें काम अचाट
चांगलेच ते पडले चाट
धडपड करिती किती प्रकारें
आयत्या वेळीं भ्याड बिचारे
बोट उचललें मागें येतें,
प्रसंग येतां असेंच होतें.

( ३ )

—आणि मग एकदांचा
-धीर केला गुंडाजीनें
भिडविलें चाका चाक

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं. नं. 92145
स्थळ प्रत

पाय ओढिला पायानें
तेव्हां खालीं कोसळतां
पोरटी ती किंकाळली
धांवा, धांवा ! धांवा, धांवा !!
पकडतो हो मवाली
सुंदरीची आर्त हांक
कोण दवडील संधी
पहा चारी दिशांहून
जमूं लागे तेथें गर्दी
दुरून ते येती लोट
पाहियेलें पुंडाजीनें
जाणुनिया काळ वेळ
कावा केला काय त्यानें—
टाकूनयां सायकली
पुंडराज सर्सावले
सोडवून अबलेला
गुंड धरायला धांवले
आतां आले खूप लोक
दृश्य त्यांना काय दिसे
गुंड्या खालीं निपचित

पुंड्या देतो आहे ठोसे
लोक देती हातभार
आपआपल्या परींनीं
बोलतात कौतुकानें
' शर्थ केली पुंडोबांनीं ! "

( ४ )

दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं
सगळ्या दैनिकांच्या मथळीं
झळके बातमी उच्च स्थळीं
वाचा–ऐका
" गुंड नामें मवाली कोणी
गांठून एकटी अबला तरुणी
करीत होता संधी साधुनी
बलात्कार
सज्जन कोणी पुंडोपंत
धांवले कोठूनसे अवचित
पाहून ललना संकटांत
सोडवीली. "

—0—

## वैपुल्य—

अनंत लाटा सागरांत
असंख्य तारका गगनांत
किती फुलें ही बागेंत ? । नवल वाटे ॥

*        *        *

वारुळामध्यें पिपीलीका
मोहोळांत किंवा मक्षिका
तारुण्यांत किंवा पीटिका । गालावरी

*        *        *

विचार करून करून
उपमा असल्या उकरून
काढतां येईल दिसोन । काय ? ऐका ॥

*        *        *

दरिद्री भिकारी दुबळे
मोजा त्यांची पोरेंबाळें
वैपुल्य याहून आगळें । असें काय ?

—0—

## बदललें बंधुप्रेम

भाऊबीजेचा आदला दिवस—

शहरांत शिकतसे राजा
दूर दूर भाऊ माझा
जाहलें वर्ष भेटून
दमले मी वाट बघून
ये नारे भाऊराया
कां करिसी पातळ माया ?

भाऊबीजेच्या दिवशीं—

आला ग माझा भाऊ
नाचूं कां गाणीं गाऊं ?
लावुनियां कुंकुम भाळीं
ओवाळिन सायंकाळीं
तेवते तुपाची ज्योती
किति पवित्र आमुची प्रीती
ओवाळणि मग घालील
तबकांत हिरा चमकेल
कां उगाच बघतां हंसुनी ?
भावाची आहे भगिनी !

## भाऊबीजेच्या दुसऱ्या दिवशीं—

कोठुन हे भाऊ येती ?
सूड तरी पुरता घेती
बहिणीला वाटे भाऊ
मूषकास जैशी माऊ
हा घरांत फिरतां फिरतां
हातांत तराजू तरता
आईनें दिधला पेढा
खाऊन पाहते थोडा
तो " खुट्ट " वाजतें कोठें
आला कां राक्षस ? वाटे
मी बसलें पत्र लिहीत
कां तुजला पंचाइत
मी लिहीन वाटेल त्याला
तूं कोण ? चोंबडा मेला
मी निजून उशिरा उठलें
मी रात्रीं जागत बसलें
मी अमुक ठिकाणीं गेलें
मी तमुक विकत आणीलें
चांभार चौकशा असल्या

कां करिसी उठल्या बसल्या
कधिं जाशिल परगांवाला
शिकण्याला कां भकण्याला ?
जा ना रे भाऊराया
कां करिसी पातळ माया ?
जोंवरी त्रास बंधूंचा
उद्धार कुठून भगिनींचा !

\+ +

हा कुठें दूर जाईना
स्वस्थता मला लाभेना
भावाचा छळ हा सारा
त्याहून पतकरे नवरा

—0—

## क्रांतीचा ठणठणाट—

फुंका ठण ठण शंख क्रांतिचा, फुंका ठण ठण ठाण्
कान किटूं दे; फुंका, भुंका कंठीं आणुन प्राण
घाला घाला खुशाल आम्हां, आम्हां तुरुंगांत
बेकारांचा तिथेंच लागे स्वर्गाला हात
नसे नोकरी, नसे तशीही राहण्यास जागा
देइ दयाळू सरकार भलें मजा न कां सांगा?
म्हणून म्हणतों किंकाळावें "क्रांति क्रांति" बेभान्
यंव् "क्रांति क्रांति" बेभान्
फुंका ठण ठण शंख क्रांतिचा फुंका ठण ठण ठाण्

\+ + +

मूर्ख कुणी आम्हांस म्हणूं द्या खुशाल बेफाम
लेख लिहा जा किंवा कांहीं बोला उद्दाम
असतिल कोणी पंडित, वक्ते फाकडे फुटाणे
पुरून उरलों आम्हीं त्यांना आम्हीही बेदाणे
शरमशून्य आम्हीं ! आम्हांला धरूं शके कोण?
लोक हो, धरूं शके कोण?
फुंका ठण ठण शंख क्रांतिचा फुंका ठण ठण ठाण्

\+ + +

अरे बध्यांनो, उगाच येथें कशास अडमडतां ?
जा आयांना कळवा आमुच्या आतांच्या आतां
सांगा " मिटली आई काळजी नको करूं खंत
क्रांति करूनी डुंबति पोरें सौख्य समुद्रांत
आनंदाच्या उसळति लाटा खवळले उधाण
आई ! खवळलें उधाण
फुंका ठण ठण शंख क्रांतिचा फुंका ठण ठण ठाण्

\+ + +

" तुला काळजी एकच होती, होती पोरांची
सुटलीं पोरें आणि लागलीं ' मार्गाला ' शिर्चीं
आई, शहाणीं तुझी कारटी या अंधारांत
बसतिल कां गे उगाच आपली तळवे चोळीत ?
नाहीं माते ! आमुच्या आशा ध्येयें अनिवार
रात्रींच्या तिमिरांत उद्यांची आखूं लूटमार "
क्रांतिचा नभीं चमके तारा करूं चला उड्डाण
दोस्त हो ! करूं चला उड्डाण
फुंका ठण ठण शंख क्रांतिचा फुंका ठण ठण ठाण्

—0—

## जीवनाचा अर्थ—

जीवनाचा अर्थ काय
प्रश्न एका चिंतातुरा
कशासाठीं जगायाचें ?
झाला बिचारा बावरा
कशासाठीं जगायाचें
काय सांगावें पामरें ?
खोल गंभीर सवालां
कशी द्यायाची उत्तरें ?
प्रश्न पडे जीवनाचा
कोणा जर खरोखरी
पहा तरी करोनिया
सुचताती नानापरी
गोड गोडशी मिठाई
किंवा मसाला झुणका
आणि द्राक्षें नारिंगांत
पहा अर्थ सांपडे कां ?
फुललेल्या उद्यानांत
सागराच्या लाटांतूनी
चांदण्याच्या प्रकाशांत

ठसतें का कांहीं मनीं ?
कथा, काव्यें, नाटकांत
गरम् गरम्शा चहांत
पहा ओढून झुरके,
अर्थ आहे का धूम्रांत
गोड बाळाच्या पाप्यांत
आणि मातेच्या ओवींत
सखे सोयरे शेजारी
अर्थ आहे का त्यांच्यांत
कापल्या त्या कटाक्षांत
आणि चोरट्या चुंबनीं
मिळतें का पहा कांहीं
गाढ गाढ आलिंगनीं
पहा येथें पहा तेथें
पहा आंत नी बाहेर
सांपडेल कोठें तरी
आयुष्याचें सर्व सार
तरी सुद्धां एखाद्याला
प्रश्न सुटेना मुळींच
पसरावा देह त्यानें

रुळावर बेदाशक
खडाडत येतां गाडी
येतां मृत्यूचा कानोसा
जीवनाचा अर्थ एक
आतां पळूं कोठें कसा ?

नों. क्र. १२८३८
२८।८।७३

——0——

# प्रेमाची कपबशी

तो—

१२३७९
२८।१।५८

मी असे काजळी कडू " चहाचा पाला "
" शर्करा " गोरटी गोड तशी तू बाला
मी " कुम्भ जळाचा " " चरवी " तूंही " दुधाची "
मी " स्टोव्ह " पेटता, " पातेली " तूं वरची
उकळवूं चहा गे प्रीतीच्या ज्वालांनीं
तूं " बशी " पिऊं का सांग ओंठ लावोनी ?

ती—

मी " बशी " वाहवा, अन् तूं " कप " ही साचा
थांब रे ! पिळूं का अस्सा कान कपाचा ?

—०—

# मेला भला मवाली

[ गल्लींतील सुप्रसिद्ध मवाली कैलासवासी झाला आहे. गल्लीं-तील तरुण स्त्रिया एकत्र जमून शोक करीत आहेत. ]

\+ + +

का हो तमाम गल्ली शोकामधें बुडाली ?
श्रीराम राम् अयाई मेला भला मवाली
रस्त्यांत हिंडतांना घालील कोण शिट्टी
थुंकेल कोण लाल चावून पानपट्टी ?
नांवेच गायनाच्या काढील कोण सूर
ओंठीं बिडी धरोनी सोडील कोण धूर ?
कपड्यांत सप्तरंगी मिरवील कोण ढंगें,
सारील कोण झुलपें कानांवरून मागें ?
येतां अरिष्ट जेव्हां दडतात बाप, भाई
छाती पुढें करोनी येईल कोण बाई ?
डॉक्टर, वकील, प्रोफे– गल्लींतले महंत
पाहून ग आम्हांला येतो तयांस ऊत
ह्या सभ्य सज्जनांच्या उडवील कोण गाली ?
सांभाळुनी रहा ग मेला भला मवाली !

—o—

## पशू—

कुणी तरुणी एकटी आडवाटे
सांजवेळीं फिरण्यास जाइ कोठें
हळू आतां अंधार पडूं लागे
भास झाला कीं कुणी तरी मागें
भास कसला, जाहला पुरा घात
कुणा पुरुषानें पकडली मिठींत
हात त्याचा कडकडा चावियेला
लाथ झडकोनी म्हणे " पशू मेला "
—पुढें चाले चण्डिका दणाणून
डिवचली ती नागीण फणाणून
पशू मागे शरमून हाय हाय
टाकतो आहे हळू हळू पाय

\+ \+ \+

मस्त धुंदेला वळू-पशू एक
आला! आला!! धरुनियां तिचा रोख
पळे माघारीं पुरा धीर खचला
घट्ट कवटाळी मवाऱ्या पशूला

—0—

## उतार

[१]

आई— अठरा पुरी जहाली
लग्नास योग्य पोरी
झालीस गे मनींचे
मज सांग काय चोरी ?
आवडी, अटी, अपेक्षा
मज साफ साफ सांग
लाजू नको मुलींही
नवरा कसा हवा ग ?

मुलगी— पदव्या हव्यात मोठ्या
मोठा भला पगार
सुंदर तरूण उमदा
ही हौस आई फार

\+ +

[२]

आई— बाविस पुरी जहाली
झालीस केवढी तू !
अजुनी कसे जमेना
कोठें तरी परंतू ?
फिरताति तीर्थरूप

लागे कुठें न थांग
जाणून हेंचि बोल
नवरा कसा हवा ग ?

मुलगी— पदव्या असो नसोत
पोटापुरा पगार
ऐसा तरूण कोणी
माझा असा विचार

\+ +

[३]

आई— सव्विस पुरी जहाली
झालीस घोडनवरी
कोठें स्थळें पहावी
कोणीच ना विचारी
घेऊन जन्म पोटीं
तूं फेडलेस पांग
शुद्धींत कारट्ये ये
नवरा कसा हवा ग ?

\+ +

मुलगी-- आई नको विचारूं
नवरा कसा हवा तें
असुं दे कसा बिचारा
मानीन गोड त्यातें

—0—

## कारण त्याचें न्यारें—

कालची पोर तूं, पोर आठ वर्षांची
करतेस छबकड्ये नक्कल कां ताईची ?
पाहून ताईचे करिसि कशाला नखरे
समजतें तुला कां कारण त्याचें न्यारें ?

+ + +

देखून कुणाला फिरवुन डोळे गोल
होतेस कशाला लाजलाजुनी लाल
ताईचे चाळे करूं नको ग सारे
समजतें तुला कां कारण त्याचें न्यारें ?

+ + +

नेसून गोल ही सुंदर साडी नील
टाकसी कशाला जपुन उगा पाऊल !
अन् पदर ढळू दे; नको सावरूं चिमुरे,
सांवरते ताई, कारण त्याचें न्यारें !

—0—

## गौळणींचा इषारा —

युगायुगांच्या पूर्वीं होतों गोकुळांत गौळणी
स्वर्गामधल्या आज अप्सरा आम्हीं साऱ्याजणी
पृथ्वीवरच्या पौर जनांनो ऐका हो ऐका
कान देउनी नीट तरी हा इषाराच पक्का

\+ + +

कृष्णा म्हणुनी काळा मुलगा गोकुळांत होता
( सांगितली कीं म्हणे तयानें कर्माची गीता ! )
त्या शाम्याचें नांव घेउनी देतां तुम्हि बाता
संगें त्याच्या आणखी करिता आमुचा बोभाटा

\+ + +

काय लागलों होतों सगळ्या कान्ह्याच्या नादीं
( बदफैली कुणि असेल राधा कोठें एखादी )
मोठ्या घरच्या सुना नि लेकी सती आम्हीं नारी
नव्हतो वदलो आज सांगतो ऐका गोष्ट खरी

\+ + +

नीटनेटका पोर सांवळा गोड यशोदेचा
गुलाम होता खट्याळ भारी सगळ्या मुलखाचा
डोक्यावरती घेत असे तो सारे गोकूळ
कटिखांद्यावर घेति गौळणी लाडानें बाळ

\+ + +

बाळ जाहले मोठे लागे गूण पाजळाया
फक्कड, भंपक तो स्त्रीलंपट करी कारवाया
शीळ घालुनी, खडे मारुनी करी किती ढंग
चिडलों आम्हीं तशा गौळणी बांधियला चंग

+ + +

एके दिवशीं नदीकिनारी धरिला सगळ्यांनीं
दगडावर हापटून टाकिली तंगडी मोडोनी
पाय मोडला परी उघडले डोळे तात्काळ
देवघरामधिं निमूट बसला लंगडा गोपाळ

+ + +

म्हणून म्हणतो सर्व कवींनो आणि लेखकांनो
गवयांनो अन् नटानटींनो तसेंच मुर्खांनों
भलतें सलतें लिहाल जर का नांवें गोपीचें
तंगड जाइल एक निखळुनी उगाच कायमचे

—0—

## व्यापारी प्रेम

येतेस दुकानीं न्याया माझा माल
बनविसी गिऱ्हाइक मला कां ग कंगाल ?
मागशी सुपारी, लवंग, मिरच्या दाणे
मी काय बांधतो प्रभू एक तो जाणे

\+ + +

येतेस सुंदरी बडी कुणी हलवाई
भरभरुन पराती आली कुठुन मिठाई ?
गालांत खवा ग बर्फी ओठावरती
नेत्रांत टपोरे ढवळे हलवे फुलती
उडतात फुटाणे हंसून नी बोलून
ही गोरी कांती, आलें दूध उतून
पाहून माल हा खजील पुरता झालो
अंदाजें किंमत करतां करतां जिरलों

\+ + +

जाणतो मात्र ग व्यापाराची नांदी
यायचीच नक्की "तेजी" नंतर "मंदी"

—o—

# दिवाळी आणि होळी

आलि दिवाळी हांसत खिदळत
नुपुरें बांधुन थुइथुइ नाचत
हिंडत भटकत ती बेछूट
घराघराला देई भेट
ती अण्णांच्या घरास आली
चराचरांच्या देहीं शिरली
जिकडे तिकडे एक धुमाळी
"आलि दिवाळी, आलि दिवाळी"

\+ +

अण्णाजींचें पोक्त कुटुंब
काकूबाई बांधिति चंग
अण्णाजींनीं हौस पुरविली
लुगडें लप्फेदार इरकली
धांदल त्यांची विचारूं नका
हेंच करूं कां, तेंच करूं कां?

\+ +

सुरेख सारें भवन रंगवा
आणि दिव्यांच्या माळा लावा
पोरेंबाळें गिल्ला करिती

अण्णाजींच्या अंवतीभंवतीं
फाड फाड उडतात फटाके
फुलबाज्यांचा प्रकाश फाके
रात्रंदिन त्या गमती जमती
गंपू बाळू, भूक विसरती
तऱ्हेतऱ्हेचे रंग आणिले
रांगोळ्यांनी अंगण भरलें
नवा रेशमी झंपर परकर
नेसुन मिरवे चिंगी जगभर

\+ \+

तशांत आली लेक जावई
दिवाळसण हो यंदा बाई !
आगत स्वागत याहो या या
सोन्याची अंगठी जावया
जामाताची भगिनी मोठी
बांधुन आलीं पोरें पाठी
जामातांची भगिनी छोटी
फुगे रुसे जरी होती नकटी

\+ \+

आप्त आणखी मित्रमंडळी
इकडुन तिकडुन जमली सगळी

विनोद, कोट्या, थट्टा टोले
तीन तास तो फराळ चाले
पुरी करंजी शंकरपाळे
लाडू चकली ध्या कडबोळे
चाले आग्रह एकामेकां
दमल्या वाढुन जरी बायका
गप्पा गोष्टी गायन वादन
नभोवाणि अन् ग्रामोफोन
कुणी वाचती दिवाळी अंक
चित्रपटाचा कोणा शोक

\+ +

दिवस मजेनें ऐसे गेले
कधीं संपले नाहिं समजले

\+ +

आण्णाजींनीं नंतर जेव्हां
हात घातला खिशांत तेव्हां
तोच हात तोंडाशी गेला
" बोंब " म्हणोनी ध्वनी निघाला
जिकडे तिकडे फुले " दिवाळी "
अण्णांच्या काळजांत " होळी "

—o—

## देव आणि भक्त

शेंदरानें माखलेली
युगें युगें ठाकलेली
किर्र रानांत एकांतीं
होती पाषाणाची मूर्ति
भक्त होता कोणी एक
वर्षावर्षांचा भाविक
नित्य नित्य तेथें येत
करी पूजा जोडी हात
कुणी हांसती खदखदां
म्हणताती खुळा वेडा
अढळ तो खरा भक्त
स्थिर त्याचें शांत चित्त

\+ +

दिनीं एके आला नेमें
करूं लागे पूजा प्रेमें
तोंच येई समोरून
नाग काळा फूत्कारून
भक्त जाहला बावरा
कांपे भीतीनें थरारा

घामावला देह सारा
होइ कावरा बावरा

\+ \+

आणि धांवला वेगानें
भक्तश्रेष्ठ आवेगानें
हातीं देव दगडाचा
फणा ठेंचला नागाचा

—0—

स्थळ प्रत

## लेंकुरवाळी

उच्छाद मांडती मेलीं
छळतात कारटी जळली
हा नको बाइ ग ताप
काय असें केलें पाप ?
तो तिकडुन " बंड्या " येतो
भोकाड पसरुनी बसतो
ही इकडुन आली " गोदी "
अवदसा खरी छळवादी
कोणाचे पुस्तक हरवे
दुसऱ्याला तिसरा तुडवे
निस्तरा कुणाचे हाल
चवथ्याचे धरते गाल

\+ \+

" तिकडून " दागिने आणले
एकांतीं पाहिन म्हटलें
पण कुठलें होय नशीबीं
बोंबलूं लागते " बेबी "
शेजारिण सीतामाई
सांगती हकीकत कांहीं

घेईन नीट ऐकून
छे: "गोंद्या" देतो कान

+ +

जा करा एकदां काळें
पुण्यवान माझी बाळें!
जा फुटला माझा ऊर
जा कुठें कुठें तरि दूर
भावाची भगिनी व्हावें
नवऱ्याची बाइल व्हावें
पण होउं नये ग बाई
पोरांची कोणी आई

——0——

## एक द्वंद्वगीत

( एका चित्रपट दिग्दर्शकाला ग्रामीण जीवनावरील एक बोलपट काढावयाचा होता. त्याला योग्य अशी एखादी खेडुत नायिका शोधण्यासाठीं तो एका खेडेगांवीं गेला. फिरतां फिरतां गुरें वळवीत असलेली एक नीटनेटकी मराठमोळा मुलगी त्याला दिसली. आणि मग— )

\+ \+ \+

तो—( कौतुकानें ) रानांवनांमधूनी
तूं एकटीच धीट
ग चाललीस कोठें !
ती—( तोंड वळवून ) अर् जा ना गुमान नीट

\+ \+ \+

तो—( प्रेमात येऊन ) डौलांत चालतांना
दिसतेस राजहंस
उचलून पाय जेव्हां-
ती—( पाय झाडून ) लाथाळ जाण म्हैस.

\+ \+ \+

तो—(अधिक प्रेमात येऊन) हे गाल गोमटे ग
मी भाग्यवंत पाही
झालेत लाल लाल
ती—( हात चोळून ) होतील कीं तुझेही

तो—( धुंदींत येऊन ) ओंठामधें गुलाबी
फुलला की ग वसंत
त्या दोन पाकळ्यांच्या
ती—( दांत करकरून ) खालींच तीक्ष्ण दांत

\+ + +

तो—( घायाळ होऊन ) वक्ष:स्थळीं विशाल
फुलली दिसे जवानी
पाहून धष्टपुष्ट
ती—( कमरेवर हात ठेवून ) शुद्धींत ये अजूनी

\+ + +

तो—(अगदीं जवळ जाऊन) खिल्लार हांकतांना
काठी तुझ्या हातांत
पडणार काय आतां—
ती—( काठी दिग्दर्शकाच्या डोक्यांत हाणून )
—मेल्याच टाळक्यांत

—०—

## सासरगीत.

माहेरचीच गीतें
कां उठसूठ गातां ?
अज्ञात सासराची
हृदयांत ओढ आतां
संपून बाल्य जातां
येतांही यौवनांत
घर दार भोंवतींचें
जणुं खावयास येत.
परक्या नव्या घराची
कां भीति दाखवीतां ?
असुं दे असो कसेंही,
कां हो उगाच चिंता ?
तें प्रेम माउलीचें—
सगळें कबूल बाई
झाले पुरे पुरेसें
चालेल सासुबाई.
सोडून जावयाचें
सगळीं बहीण, भाऊ
मिळतील ना परंतू

तिकडेही दीर, जाऊ ?
आणखी मिळेल कोण ?
मिळणार कोण दुसरें ?
कां ग उगाच थट्टा ?
उघडें गुपीत सारें !
माहेरचेंच गांव
टुमदार रम्य छान
तैसेंही सासराला
नाहीं कशावरून ?
जाऊन सासराला
नवजीवनीं रमावें
माहेरचें नि गाणें
तेथें खुशाल गावें

—0—

# आई कशी ओळखावी ?

मोकळ्या त्या अंगणांत
बायकांचा कलकलाट
काय आहे तरी काय ?
कसला हा चिव्चिवाट ?
दुडुदुडु धांवे मधें
गोरापान गोड बाळ
आणि त्याच्या भंवताली
ललनांचा हो गोंधळ
घेती कटिखांद्यावरी
पुन्हा पुन्हा पापे घेती
" घेईन मी घेईन मी "
एकमेकींशीं भांडती

\+ \+

बाळ अबोल हांसरं
रमणींच्या घोळक्यांत
साहजिक कोडें पडे,
कोण ' आई ' त्याची यांत ?

\+ \+

आणि इतुक्यांत बाळ
करी करूं नये तेंच
मांडियेले प्रदर्शन
( रामा ! ) बीभत्स रसाचं ! !
वत्सल त्या आयाबाया
किंचाळल्या " शीऽग, बाई "
पळताती चारी दिशा
अंगणांत शांत होई
\+ \+
तेथें एकटी राहिली
ओचे पदर खोचोनी
कोण तरी राहाणार ?
तीच बाळाची जननी !

—0—

माफी—

( शेवटीं एक प्रयोग करून पहातों. महाकवि मनमोहन किंवा मर्ढेकर यांच्यासारखें एखादें " नवकाव्य " आपल्याला करतां येतें कां बघावें म्हणतों. छेः पण तें कुठलें आम्हांला जमणार? आम्हीं आपलें असेच आहोत झालं! तरी पण माणसानें प्रयत्न कां करूं नये?)

[ वृत्त—चालढकल
किंवा
छंद—रामभरोसे
ताल—बेताल
गण—राक्षस
मात्रा—पित्ताची—म्हणजे पित्त चढविणारी;
उतरविणारी नव्हें.
वगैरे वगैरे व- - ]

\+ + +

क्षमा करा! क्षमा करा!!
वाचकांनों, रसिकांनो,
कुणी असाल त्यांनो
क्षमा करा
छळलें तुम्हांला
फार फार

फार

फा--

र--

वेळ तुमचा मी "मोडला"

जसा उसाचा दांडा कटकन्

किंवा रुपया हॉटेलान्

क्षमा करा, क्षमा करा

दिलगीर आहे पुरा पुरा

फार फार

फार

फा—

र—

"पिकले" असेल टाळके तुमचें

जैसे आंबे आढीमधें

जळलें कीं तुमचे पैसे

जैसे पेट्रोल मोटारींत

खरेंच मी आहे "सॉरी"

फार फार

फार

फा—

र—

## माफी—

( शेवटीं एक प्रयोग करून पहातों. महाकवि मनमोहन किंवा मर्ढेकर यांच्यासारखें एखादें " नवकाव्य " आपल्याला करतां येतें का बघावें म्हणतों. छेः पण तें कुठलें आम्हांला जमणार? आम्हीं आपलें असेच आहोत झालं ! तरी पण माणसानें प्रयत्न कां करूं नये ? )

[ वृत्त— चालढकल
किंवा
छंद—रामभरोसे
ताल—बेताल
गण—राक्षस
मात्रा —पित्ताची—म्हणजे पित्त चढविणारी;
उतरविणारी नव्हे.
वगैरे वगैरे व- - ]

\+ + +

क्षमा करा ! क्षमा करा ! !
वाचकांनों, रसिकांनो,
कुणी असाल त्यांनो
क्षमा करा
छळलें तुम्हांला
फार फार

अडकला होता इतका वेळ
जणुं पातेली साणशींत
किंवा सुपारी अडकित्त्यांत
कीं "ओला उंदीर" चापांत
क्षमा करा, करा,
वडविली तुम्हांला अद्दल
दुःख मला होतें त्याबद्दल
फार फार
फार
फा—
र—

पकडली तुमची मानगूट
आणि.... ..........

( वाचकहो, बस्स् झालं, पुढें आपल्याला कांहीं करता येत नाहीं. तरी मला पहिल्यापासूनच वाटत होतं कीं हें नवकाव्याचें तंत्र जमणार नाहीं म्हणून. जाऊंद्या माझा हेतु तुमच्या ध्यानांत आला असेलच. वाटेल तें वाचायला लावून तुमचा अंत पाहिल्याबद्दल मी आपली क्षमा मागतो आहे. )

—: समाप्त :—

REFBK-0007647
REFBK-0007647
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१४ दा. क. ७६४७

--खरं-खोटं

सदाशिव आठवले

यांच्या लघुकथांचा संग्रह

—" खरं-खोटं "

लवकरच प्रसिद्ध होईल.